दि. १६/०५/२०२३

पुण्य नगरी पा. न. १

# दंगली घडवू देणार नाही !

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही



**पुणे :** काही लोक तणाव निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. अकोल्यातील परिस्थिती पूर्ण नियंत्रणात असून पोलीस लक्ष ठेवून आहेत. राज्यातील वातावरण बिघडवण्याचे काम जाणूनबुजून होत आहे, परंतु महाराष्ट्रात कोणालाही दंगली घडवू देणार नाही, असे राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

पिंपरी-चिंचवड दौऱ्यावर असताना सोमवारी ते पत्रकारांशी बोलत होते. अकोल्यातील दंगलीबाबत विचारले असता फडणवीस म्हणाले, राज्यातील वातावरण बिघडवण्याचे काम जाणूनबुजून होत आहे. याला कोणाची तरी फूस आहे. कोणीतरी जाणीवपूर्वक महाराष्ट्रातील कायदा-सुव्यवस्था बिघडवण्याचा प्रयत्न करत आहे. पण ते सफल होणार नाहीत. अशा प्रकारे जे करतात त्यांना सोडले जाणार नाही. पाठीमागून आग लावण्याचा, आगीत तेल ओतण्याचा प्रयत्न काही जण करत आहेत. हे सगळे बाहेर आणले जाईल.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह १६ आमदार अपात्रतेच्या मुद्द्यावरून विचारले असता फडणवीस म्हणाले, विधानसभा अध्यक्षांना घेराव घालू, त्यांना चालू देणार नाही, अशी उद्धव ठाकरे यांची भाषा ▶▶ पान ९ वर...

### भाजपमधील सर्वच नेते महत्त्वाचे!

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशिवाय भाजपमध्ये कोणाला किती महत्त्व आहे, यावर राज ठाकरे यांनी टिप्पणी केली होती. याबाबत बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, आमच्या लेखी सर्व भाजपमधील नेते हे महत्त्वाचे आहेत. राज ठाकरे यांनी याबाबत बोलू नये. आम्हाला आमचे नेते किती महत्त्वाचे हे चांगले समजते, असा टोला त्यांनी पत्रकारांशी संवाद साधताना लगावला.

पुण्य नगरी पा. न. ९

## दंगली घडवू देणार नाही!

(पान १ वरून) लोकशाहीत बसणारी आहे का, याचा विचार करावा. आपली बाजू कमकुवत असेल तर अशा प्रकारची विधाने केली जातात. त्यांना महाराष्ट्रात दंगली घडवू देणार नाही, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## शेवगाव दंगलीतील दोषींवर कठोर कारवाई करा!

(पान १ वरून) केली आहे. जातीय दंगली रोखण्यासाठी दोषींवर कडक कारवाई करण्याचे निर्देश शिंदे यांनी पोलीस महासंचालकांना दिले आहेत. जिल्हा आणि पोलीस प्रशासनाने जातीय दंगली घडणार नाहीत याची खबरदारी घ्यावी, अशा सूचनाही शिंदे यांनी दिल्या आहेत. कायदा हातात घेऊन जातीय द्वेष पसरवून सामाजिक सलोखा धोक्यात आणणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येईल. कुणीही कायदा हातात घेऊ नये, सोशल मीडियावर कोणतीही पोस्ट टाकताना काळजीपूर्वक आणि जबाबदारीने टाकावी, आपण केलेल्या पोस्टमुळे सामाजिक तणाव निर्माण होणार नाही आणि कुणाच्या भावना दुखावणार नाहीत, याची काळजी घेण्याचे आवाहनही शिंदे यांनी केले आहे.

पुण्य नगरी पा. न. १

## शेवगाव दंगलीतील दोषींवर कठोर कारवाई करा – मुख्यमंत्री

**मुंबई :** अकोला आणि शेवगाव येथे झालेल्या दंगलींना जबाबदार असणाऱ्यांवर कठोर कारवाई करा, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले



आहेत. सामाजिक सलोखा राखला जाईल, कुणाच्याही भावना दुखावणार नाही, याची काळजी घेऊन सामाजिक सलोखा ठेवण्यासाठी जनतेने सहकार्य करण्याचे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले आहे. अकोला आणि शेवगाव येथे झालेल्या दंगलींनंतर या दोन्ही ठिकाणी परिस्थिती आता नियंत्रणात असून चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेवरून येथे ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी अकोला येथे तर शेवगाव येथे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी भेट देऊन पाहणी ▶▶ पान ९ वर...

CamScanner

दि. १६/०५/२०२३

पुण्य नगरी पा.न.१

# समिती स्थापन करून बेपत्ता महिलांचा शोध घ्या

## ▌चाकणकर यांनी गृह विभागाला दिल्या सूचना



**▌मुंबई** : राज्यातील महिला व मुली बेपत्ता होण्याची गेल्या काही महिन्यांतील आकडेवारी चिंताजनक असून या महिलांच्या तपासासाठी गृह विभागाने समिती स्थापन करत शोध मोहीम राबवावी तसेच दर पंधरा दिवसांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगास सादर करावा, अशी सूचना गृह विभागाला राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी केली आहे.

गेल्या काही महिन्यांपासून राज्यातील मुली व महिला मोठ्या प्रमाणावर बेपत्ता होत असून यात १६ ते ३५ वयोगटातील महिलांची संख्या लक्षणीय आहे. महाराष्ट्र पोलीस, गृह विभाग या बेपत्ता महिलांच्या तपासासाठी करत असलेल्या कारवाईचा आढावा घेण्यासाठी सोमवारी राज्य महिला आयोग कार्यालयात सुनावणी घेण्यात आली. यावेळी महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर, सदस्या अॅड. गौरी छाब्रिया, सुप्रदा फातर्पेकर, महिला व बाल अपराध प्रतिबंध विभागाचे विशेष पोलीस महानिरीक्षक दीपक पांडे, कायदा व सुव्यवस्था पोलीस महासंचालक ▶▶ पान ९ वर...

# समिती स्थापन करून बेपत्ता महिलांचा शोध घ्या!

(पान १ वरून) सुहास वारके, पोलीस उपायुक्त डॉ. स्वामी, गृह विभागाचे सह सचिव राहुल कुलकर्णी, महिला आयोगाच्या उपसचिव दीपा ठाकूर, विधीतज्ज्ञ अॅड. वीरेंद्र नेवे उपस्थित होते. या बैठकीत राज्यातील बेपत्ता होणाऱ्या महिला, त्यांच्या तपासासाठी पोलीस तसेच गृह विभाग करत असलेली कार्यवाही, पोलिसांना बेपत्ता महिलांच्या तपासकार्यात येणारे अडथळे याचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

यानंतर माध्यमांशी संवाद साधताना चाकणकर म्हणाल्या, राज्यातून महिला व मुली बेपत्ता होणे ही चिंतेची बाब आहे. १ जानेवारी ते ३१ मार्च दरम्यान राज्यातील ३५९४ महिला हरवल्या आहेत, यातील काहींचा शोध लागला असला तरी एकंदरीतच ही गंभीर बाब आहे. आयोग सतत याबाबत पाठपुरावा करत असल्याने महिलांना आमिष दाखवून परदेशी पाठवणाऱ्या मुंबईतील साकिनाका भागातील दोन एजंटविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. मात्र ही मोठी यंत्रणा असल्याने याविरोधात ठोस कारवाई करणे आवश्यक आहे. राज्यातील मिसिंग सेल, अनेक जिल्ह्यातील भरोसा सेल हे केवळ कागदावरच आहेत, ही वस्तुस्थिती आहे, असे सांगत महिलांच्या तपासासाठी गृह विभागाने समिती स्थापन करत शोध मोहीम राबवावी तसेच या मोहिमेअंतर्गत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दर १५ दिवसांनी आयोगाला सादर करावा, अशी सूचना त्यांनी गृह विभागाला केली. तसेच बेपत्ता महिलांच्या शोधासाठीच्या समितीमध्ये पोलिसांचा समावेश असावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.

पुण्य नगरी पु.पा.न.४

# जाब विचारल्याने दोन भावांवर हल्ला, एकाचा मृत्यू

## पोलिसांकडून दोघांना अटक

**▌नालासोपारा** : बायकोच्या फोनवर का बोलतोस, असा जाब विचारणाऱ्या पतीवर आणि दिरावर आरोपींनी चाकूहल्ला केल्याची घटना विरार पूर्व येथे रविवारी रात्री घडली. यामध्ये दिराचा मृत्यू झाला असून पतीची प्रकृती गंभीर असून त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी विरार पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करून दोन आरोपींना विरार पोलिसांनी अटक केली आहे.

दत्तात्रय शिंदे यांचे किरण शिंदे, राहुल शिंदे व अन्य एका तरुणाशी साईनाथ नगर नाका येथे माझ्या बायकोशी फोनवर का बोलतो? यावरून वाद झाला. आधी शांतपणे चाललेले बोलणे काही वेळातच जोरात होऊ लागले आणि त्याचे रुपांतर जोरदार भांडणात झाले. या तिघांचेही त्याच्याशी जोरदार भांडण सुरु झाल्याने एकमेकांची कॉलर धरण्यापर्यंत मजल गेली. यावेळी आपल्या भावाच्या बचावासाठी सचिन शिंदे धावून आला. राहुल शिंदे याने बचावासाठी आलेल्या दत्तात्रय शिंदे यांचा लहान भाऊ सचिन शिंदे याच्या पोटात चाकूने वार केला. सचिनचा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला, तर दत्तात्रय जखमी झाले. त्यांच्यावर एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी विरार पोलिसांनी गुन्हा दाखल करून किरण आणि राहुलला अटक केली.

CS CamScanner

CS CamScanner

लोकमत पा.न. ४

# भावाला वाचवायला गेला, अन् स्वत: समुद्रात बुडाला

## सुट्टी लागल्याने आला होता मावशीकडे



लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : समुद्रकिनारी क्रिकेट खेळताना बॅटने जोरदार टोलवलेला चेंडू समुद्राच्या पाण्यात गेला. तो बाहेर काढण्यासाठी गेलेला भाऊ बुडताना पाहून त्याला वाचवायला गेलेल्या सतरा वर्षांच्या मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना वसईत भुईगाव समुद्रकिनारी शनिवारी संध्याकाळी घडली आहे.

साहिल त्रिभुवन असे या मृत मुलाचे नाव असून तो मूळचा छत्रपती संभाजीनगर येथील राहणारा आहे. सुटी असल्याने काही दिवसांपूर्वी तो नालासोपाऱ्यात आपल्या मावशीकडे आला होता. रविवारी रात्री तो छत्रपती संभाजीनगर येथे परतीच्या प्रवासासाठी निघणार होता. त्या अगोदरच त्याच्यावरती काळाने घाला घातला आहे. आयुष्यात पहिल्यांदाच समुद्र पाहिल्यामुळे तो हरखून गेला होता. शनिवारी संध्याकाळी साहिल दोन मावस भावांसह भुईगाव समुद्रकिनारी क्रिकेट खेळण्यासाठी गेला. यावेळी पाण्यात गेलेला चेंडू काढण्यासाठी साहिलचा भाऊ पाण्यात उतरला असताना तो बुडू लागला. त्याला वाचवण्यासाठी साहिल धावून गेला, मात्र साहिलचाच पाण्यात बुडून मृत्यू झाला. ही माहिती कळताच वसई पोलिस व पालिका अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले होते.

लोकमत पा.न. ४



# तंबाखूजन्य पदार्थ जप्त

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : नायगाव येथे किराणा दुकानदाराकडे तंबाखूजन्य पदार्थाचा साठा विक्रीसाठी ठेवला असताना पोलिसांनी जप्त केला आहे. जुचंद्र गावाच्या हद्दीतील मंगलमूर्ती किराणा दुकानांमध्ये आरोपी फहीम हासीउद्दीन अहमद (३१) यांनी शनिवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास ४३६२ रुपये किमतीचा महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला सुगंधित पान मसाला असा तंबाखूजन्य पदार्थ गुटखा विक्री करता ठेवला असताना सापडला होता. रविवारी नायगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

लोकमत पा.न. ४



# लघुशंकेसाठी थांबला आणि चोरांनी लुटले

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : लघुशंकेसाठी रस्त्यात थांबलेल्या दुचाकीस्वाराला लुटण्यात आल्याचा प्रकार नायगाव येथे घडला आहे. कामण, सारजा गाव येथे राहणारे हिराजी वसंत पाटील (वय ४३) हे शनिवारी रात्री अडीचच्या सुमारास सारजा फाट्याजवळ दुचाकीवरून जात असताना लघुशंका आली म्हणून रस्त्याच्या कडेला गाडी उभी करून थांबले असताना तीन आरोपींनी त्यांना पकडून त्यांच्याकडील दुचाकी, मोबाइल फोन, रोख रक्कम व गळ्यातील १० ग्रॅम वजनाची सोनसाखळी असा ९१ हजार १०० रुपये किमतीचा मुद्देमाल घेऊन पळून गेले. रविवारी नायगाव पोलिसांनी जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

लोकमत पु. पा.न. ३


# क्लस्टरमुळे कोळीवाडे, गावठाण होणार उद्ध्वस्त

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : भाईंदरच्या उत्तन, पाली, चौक परिसरातील स्थानिक मच्छीमारांचे कोळीवाडे आणि शेतकऱ्यांची गावठाणे उद्ध्वस्त करून तब्बल १२७ हेक्टर जमिनीवर क्लस्टर योजना विकासकांच्या फायद्यासाठी राबवली जात असल्याचा आरोप मच्छीमार व स्थानिकांनी केला. भूमिपुत्रांचे अस्तित्व संपवणारा क्लस्टर प्रकल्प रद्द केला नाही तर तो हाणून पाडू, असा इशारा त्यांनी दिला.

सरकारच्या समूह विकास नियंत्रण नियमावलीनुसार मीरा-भाईंदर महापालिकेने शहरात २४ परिसर क्लस्टर योजनेनुसार विकसित करण्याचे आराखडे मंजूर केले. समुद्रकिनाऱ्यावरील चौक (२५.७६ हेक्टर), पाली (४७.७८ हेक्टर), करई पाडा (२६.५०), धावगी झोपडपट्टी (६.२० हेक्टर) व भाटे बंदर (२०.५० हेक्टर) या परिसराचा समावेश क्लस्टर योजनेत केला आहे. त्याला आता स्थानिकांनी विरोध सुरू केला आहे.

उत्तन परिसरात क्लस्टर योजना लागू करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी, संस्था वा नागरिकांनी मागणी केली नसताना कोळीवाडे व गावठाणावर क्लस्टर लादण्यात आली आहे. हा परिसर गावठाण क्षेत्र, पोर्ट ट्रस्ट, शासकीय व खासगी जमीन, आरक्षणामध्ये समाविष्ट आहे. येथील ८० टक्के लोक पिढीजात मासेमारी व शेतीवर अवलंबून असून, आपला पारंपरिक व्यवसाय, संस्कृती सांभाळून आहेत.



### मासे सुकविण्याच्या जागा नामशेष होणार

- मच्छीमार व शेतकऱ्यांची घरे मोठी असून, कुटुंबसुद्धा मोठे व वाढते आहे. मासेमारीसाठी लागणारा समुद्रकिनारा, मासळी सुकविण्यासाठीच्या मोकळ्या जागा, मासळीचे कोल्ड स्टोरेज आदी आवश्यक आहेत.
- त्यामुळे कोळीवाडे व गावठाण तसेच मासळी सुकवण्याच्या जागा या क्लस्टरमुळे नामशेष होऊन त्या ठिकाणी विकासकांना मोठ्या प्रमाणात भूखंड मिळून तेथे आलिशान इमारती, बंगले, बार-हॉटेल आदी उभारले जातील.

लोकमत पा.न. १०

# 'द केरल स्टोरी' : सुप्रीम कोर्टात आज सुनावणी




लोकमत न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : 'द केरल स्टोरी' चित्रपटाच्या प्रदर्शनाला स्थगितीस नकार देणाऱ्या केरळ उच्च न्यायालयाच्या आदेशाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालय मंगळवारी सुनावणी करणार आहे. या चित्रपटाचे प्रदर्शन ५ मेपासून चित्रपटगृहांत सुरू झाले आहे.

ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी सोमवारी न्यायालयात पत्रकार कुर्बान अली यांनी दाखल केलेल्या अपीलचा उल्लेख केला. सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड व न्यायमूर्ती पी. एस. नरसिम्हा, न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला यांचे पीठ आज सुनावणीसाठी तयार झाले होते. मात्र, नंतर पीठाने सोमवारी दुपारी तीन वाजता एका विशेष पीठासमोर काही विषयांवर सुनावणी असल्याने या अपीलावर १६ मे रोजी सुनावणी घेण्यात येईल, असे सांगितले.

CamScanner

दि. १६/०५/२०२३

लोकमत पु. पा. न. १

# नऊ मोबाइल पळविले



लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** भाईंदर पूर्वेच्या इंदिरानगर झोपडपट्टीत चोरट्याने धुमाकूळ घालून शनिवारच्या पहाटे चार घरांच्या कड्या तोडून नऊ मोबाइल चोरून नेले आहेत. नवघर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

हसनेल व मिराज यांच्यासह राहणाऱ्या अल्ताफ शेख (वय २०) याने सकाळी उठून पाहिले असता त्याचा व हसनेलचे १८ हजारांचे दोन मोबाइल चोरीला गेले होते. चंद्रभूषण गल्लीत रिक्षाचालक कैलासनाथ यादव (३२) हे पहाटे तीनच्या सुमारास लघुशंकेसाठी उठले असता दार उघडे होते. त्यावेळी तिघांचे मिळून ३० हजारांचे तीन मोबाइल चोरीला गेले होते. गल्ली क्र. ३ मध्ये राहणारे सफाई कामगार अमेश जाधव (४०) हे सकाळी कामावर जायचे म्हणून उठले असता दाराची काडी तुटलेली, दरवाजा उघडा होता. त्यांचा पाच हजार ५०० रुपयांचा मोबाइल चोरीला गेला. गल्ली क्रमांक २ मध्ये मित्र प्रदीपकुमार गुप्ता व सोनू वरुण यांच्यासह राहणारे मुस्कीम नूरअली खान (३४) यांना पहाटे जाग आली असता दार उघडे दिसले. त्यांचे तीन मोबाइल चोरीला गेले आहेत.

लोकमत पु. पा. न. १

# शाळा परिसरात गुटख्याची विक्री

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** भाईंदर पूर्वेच्या अभिनव शाळा व महाविद्यालय परिसरातील पानटपऱ्यांवर सर्रास बंदी असलेला गुटखा विकला जात असल्याचे पोलिसांच्या छाप्यात उघड झाले आहे.

अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक शाखेच्या पथकाने रविवारी अभिनव शाळा परिसरात छापे मारून साई सरिता इमारतीत असलेल्या मौर्या पान गादीचा सत्येंद्र मौर्या (वय ३८, रा. सुखसागर, अभिनव नाका) व बरकती भवन येथील बरकती पान गादीचा रघू खस्ते मिरझा (३४) यांना पकडले. त्यांच्याकडून गुटखा आणि रोख जप्त केली. त्यांनी हा गुटखा बबलू खान (रा. हनुमाननगर, भाईंदर पूर्व) याने दिल्याचे सांगितले. याप्रकरणी नवघर पोलिस ठाण्यात सत्येंद्र, रघू व बबलू या तिघांवर गुन्हा दाखल झाला आहे.

पुढारी पु. पा. न. २

# ऐन हंगामात चोरीला गेलेला ट्रॅक्टर मिळाला

**खानिवडे :** नांगरणीचा हंगाम नसल्याने खानिवडे येथील शेतकरी नारायण तरे यांनी आपल्या गावशेजारील महामार्गाच्या पलीकडे असलेल्या शेतघरात पॉवर टिलर ट्रॅक्टर त्याचे काम नसल्याने ठेवून दिला होता. शनिवारी २२ एप्रिल रोजी सकाळी शेतात गेले तेव्हा त्यांना ट्रॅक्टर तेथे नसल्याचे दिसून आले. त्यांनी याबाबत मांडवी पोलिसांत तक्रार नोंदवली होती. तक्रार दाखल झाल्यानंतर मांडवी पोलीस याबाबत तपास करीत होते . त्या तपासात सीसीटिव्ही फुटेजमध्ये एक महिंद्रा पिक अप गाडीत ट्रॅक्टर नेत असताना दिसून आले होते. त्याचा छडा लावत पोलिसांनी तलासरी भागातील रहिवाशी असलेल्या तिघांना ताब्यात घेऊन चोरी उघड केली. यात आणखीन तीन परप्रांतीय आरोपी असल्याचे सांगण्यात आले असून लवकरच त्यांना जेरबंद करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. मात्र चोरीला गेलेले ट्रॅक्टर मांडवी पोलिसांनी मिळवुन दिल्याने शेतकरी त्यांचे कौतुक करत आहेत.

पुढारी पा. न. ८

# क्रिकेट मॅचवर सट्टा लावणाऱ्यावर नवघर पोलिसांची कारवाई

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

नवघर पोलीस ठाणे हद्दीत आयपीएल क्रिकेट मॅचवर सट्टा लावणाऱ्या एका इसमावर नवघर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाने कारवाई केली आहे.

नवघर पोलीस ठाणे हद्दीत नवघर रोड येथील आशिष रेस्टॉरंट आणि बारमध्ये क्रिकेट बॅटिंग चालू असल्याची माहिती नवघर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाला मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून त्या ठिकाणी छापा टाकला त्यावेळी त्या बारमध्ये एक इसम आयपीएल क्रिकेट मॅचवर सट्टा खेळत असल्याचे दिसून आले. त्याला नाव विचारले असता चेतन सुरेशचंद्र शहा ( ४७ ) असे सांगितले. शहा हा टाटा आयपीएलच्या पंजाब किंग्स व दिल्ली कॅपिटल या दोन संघांमध्ये खेळल्या जाणाऱ्या क्रिकेट मॅचवर ऑनलाईन पद्धतीने लावलेला सट्टा लावत असल्याचे दिसून आले. चेतन शहा याच्याकडे चौकशी केली असता सट्टा खेळण्यासाठी मनीष केळस्कर व सुरज चौरासिया हे सट्टा लावण्यासाठी पैसे देत असल्याचे सांगितले. चेतन सुरेशचंद्र शहा हा आशिष बार अॅण्ड रेस्टॉरंट, नवघर रोड, भाईंदर पूर्व येथे स्वतःचे अर्थिक फायद्यासाठी लबाडीने मोबाईल व त्यातील इंटरनेट तंत्राचा क्रिकेट सट्टा (जुगार खेळण्यासाठी गैरवापर केला व क्रिकेट मॅचच्या हार-जीतवर मोबाईल व्दारे सट्टा लावतांना मिळुन आलेले आहेत. त्यामुळे मुंबई जुगार कायदा कलम ४ (अ), ५ सह इंडियन टेलीग्राम ऍक्ट १९८५ कलम २५ (क) प्रमाणे गुन्हा केल्याने त्याचेविरुध्द नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

CamScanner

दि. १६/०५/२०२३

पुढारी पा.न. २

# आधी निर्णय पक्षाचा, त्यानंतर अपात्रतेचा : विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**



आमदारांच्या अपात्रतेचा निर्णय घेण्यापूर्वी पक्ष कुणाचा याचा निर्णय घ्यावा लागणार आहे. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार आमदारांच्या अपात्रतेच्या मागणीवर निर्णय घेतला जाणार आहे. लवकरात लवकर ही प्रक्रिया सुरू केली जाईल. मात्र, कोणाच्या आरोपांना घाबरून निर्णय घेणार नाही, असे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सोमवारी स्पष्ट केले.

आपल्या लंडन दौऱ्यावरून मुंबईत परतल्यावर माध्यमांशी बोलताना राहुल नार्वेकर यांनी अपात्रतेबाबत निर्णय घेताना कोणतीही घाई करणार नाही किंवा विनाकारण विलंबही करणार नसल्याचे स्पष्ट केले. या प्रक्रियेला जितका वेळ लागेल तोच यासंदर्भातील योग्य कालावधी (रिझनेबल टाईम) आहे.

आमदार अपात्रतेबाबत नियम, घटनेतील तरतुदी आणि सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या आधारे निर्णय घेतला जाईल, असे नार्वेकर म्हणाले. अपात्रतेबद्दल ज्या याचिका दाखल झाल्या आहेत, त्यावर लवकरात लवकर निर्णय घेण्याचा आमचा प्रयत्न असेल. मात्र, ही एक मोठी प्रक्रिया आहे. त्यात नैसर्गिक न्यायाच्या तत्वाने संबंधितांना आपले म्हणणे मांडण्याची संधी द्यावी लागेल. काहीजणांनी आपली बाजू मांडण्यासाठी वेळ मागून घेतला आहे, असेही ते म्हणाले.

मात्र, सर्वप्रथम याप्रकरणात राजकीय पक्ष कोणाचा आहे, याचा निर्णय करावा लागणार असल्याचे राहुल नार्वेकरांनी सांगितले. शिवसेना कोणाची याबाबत केंद्रीय निवडणूक आयोगाने घेतलेला निर्णय हा सद्यस्थितीवर होता. पण, आमच्याकडील प्रकरणात तो पूर्वलक्षी प्रभावाने घ्यावा लागणार आहे. त्यावेळी भरत गोगावले किंवा सुनील प्रभू हे कोणाचे प्रतिनिधित्व करतात, त्यांचा राजकीय पक्ष नेमका कोणता, हे निश्चित करून पुढील प्रक्रिया सुरु होईल, असेही नार्वेकर म्हणाले.

आमदार अपात्रतेच्या संदर्भात १५ दिवसांत निर्णय घ्यावा, अशी मागणी ठाकरे गटाने केली आहे. याकडे लक्ष वेधले असता, मागण्या सर्वजण करत असतात. पण कायदेशीर बाबी पूर्ण करायच्या आहेत. ही सर्व प्रक्रिया पूर्ण केल्यानंतरच निर्णय घेतला जाईल. संविधानातील तरतुदी आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार निर्णय होईल. कुणाच्याही मनाप्रमाणे किंवा विरुद्ध तो होणार नाही. मात्र, कुणाच्याही आरोपांना घाबरून मी निर्णय घेत नाही, असेही राहुल नार्वेकर यांनी सांगितले. विधानसभा अध्यक्ष म्हणून माझे काय अधिकार आहेत, याची मला माहिती आहे आणि ते कसे बजावायचे हेही मला ठाऊक आहे, असेही नार्वेकर म्हणाले.

## अपात्रतेच्या निर्णयासाठी ठाकरे गटाचे उपाध्यक्षांना पत्र

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या चौकटीत १६ आमदारांच्या अपात्रतेचा निर्णय घ्यावा, या मागणीसाठी शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्यांनी सोमवारी विधानसभा अध्यक्ष नरहरी झिरवळ यांची भेट घेतली. यावेळी उपाध्यक्षांना सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाची प्रत आणि मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

राज्यातील सत्तासंघर्षावर ११ मे रोजी सर्वोच्च न्यायालयाने आपला निकाल दिला. विधानसभा अध्यक्षांनी योग्य कालावधीत निर्णय घ्यावा असे सांगतानाच काही मर्यादांची चौकटही न्यायालयाने घालून दिली. या पार्श्वभूमीवर विधानसभा अध्यक्षांनी आमदार अपात्रतेवर तातडीने निर्णय घ्यावा, या मागणीसाठी ठाकरे गटाच्या नेत्यांनी आज विधानभवन गाठले. अपात्रतेसंदर्भातील निर्णय विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडे होणार आहे. सध्या लंडन दौऱ्यावर असणारे नार्वेकर आज दुपारीच मुंबईत परतणार होते. तरीही, आ. सुनिल प्रभू, अनिल परब, विलास पोतनीस, सचिन अहिर आदी ठाकरे गटातील आमदारांच्या शिष्टमंडळाने उपाध्यक्ष नरहरी झिरवळ यांची भेट घेत आपल्या मागण्यांचे निवेदन सादर केल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत होते. उपाध्यक्षांकडे मागणी करण्यामागे काही राजकीय डावपेच, खेळी आहे का, अशी शंका व्यक्त करण्यात येत होती.

मात्र, राहुल नार्वेकर मुंबईत नसल्याने उपाध्यक्षांकडे निवेदन दिल्याचा खुलासा, सुनील प्रभू यांनी यानंतर माध्यमांशी बोलताना दिला. आमचे निवेदन उपाध्यक्षांच्या मार्फत अध्यक्षांकडे जाईल. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाच्या चौकटीतच आम्ही १६ आमदारांच्या अपात्रतेबाबत निर्णय घेण्याची मागणी केली आहे. मागच्या आठवड्यात निकाल लागला, त्याची प्रत आणि मागण्यांचे निवेदन आम्ही उपाध्यक्षांना दिले आहे. सर्वोच्च न्यायालयाने १६ आमदारांच्या अपात्रतेच्या संदर्भात लवकरात लवकर निर्णय घेण्याची सूचना केली आहे. त्यामुळे सुनावणीची प्रक्रिया सुरु करून लवकरात लवकर निर्णय घ्यावा, अशी मागणी आम्ही केली आहे. अशाच एका प्रकरणात मणिपूरमध्ये जशी लवकर सुनावणी झाली तशी सुनावणी व्हावी, अशी मागणी प्रभू यांनी यावेळी केली.

पुढारी पु. पा. नं. २

## नालासोपाऱ्यात ज्वेलर्स लुटण्याच्या प्रयत्न

**नालासोपारा :** नालासोपाऱ्यात ज्वेलर्स दुकान लुटण्याचा प्रयत्न करणाऱ्या सराईत चोरट्यांना गुन्हे शाखा ३ च्या वतीने अटक करण्यात आली आहे. दीपकसिंग टाक असं या आरोपीचे नाव असून तो भिवंडी येथील राहणारा आहे. या आरोपीने नालासोपारा एसटी डेपो परिसरात असलेल्या कावेरी ज्वेलर्सचे लॉक तोडून चोरीचा प्रयत्न केला होता मात्र दुकानाचे मुख्य लॉक न तुटल्याने ज्वेलर्स दुकानाच्या बाहेरील सिसिटीव्ही कॅमेऱ्याची चोरी केली होती. ज्वेलर्समालकाने या प्रकरणी तक्रार केल्यानंतर पोलिसांनी आजूबाजूच्या दुकानाचे सिसिटीव्ही फूटेज तपासून आरोपीला अटक केली आहे. त्याकडे अधिक चौकशी केली असता त्याने चोरलेल्या २ इको कार व एक एन्जॉय कारही पोलिसांनी हस्तगत केली आहे. पोलिसांनी त्याच्या एका साथीदारालाही अटक केली असून या आरोपीवर खून, दरोडे, घरफोडी विशेष ज्वेलर्स दुकानात चोरीचे दहा हून अधिक गंभीर गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

CamScanner

दि. १६/०५/२०२३

सकाळ पा.नं. ५

# उपायुक्तांसह अभियंत्यांवर कारवाईची टांगती तलवार

## वसई-विरार पालिका आयुक्तांना अवर सचिवांचे निर्देश

विरार, ता. १५ (बातमीदार) : वसई-विरार महापालिका क्षेत्रात अनधिकृत बांधकामे वाढत असल्याने अवर सचिव निकिता पांडे यांनी दखल घेतली आहे. त्यामुळे अनधिकृत बांधकाम विभागाचे प्रमुख अजित मुठे, सहायक आयुक्त नीता कोरे आणि अभियंता कृतार्थ धानवे यांच्या विरोधात कामात हलगर्जीपणा केल्याचा ठपका ठेवत त्यांची चौकशी करून फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे पत्र निकिता पांडे यांनी पालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांना दिल्याने पालिकेतील भ्रष्ट अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

वसई-विरार महापालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांनी वसई-विरार महापालिकेच्या विकास आराखड्यातील आरक्षित जागा आणि शहरात होणाऱ्या अतिक्रमणांविरोधात कारवाई करण्यासाठी महापालिकेने २९ ऑक्टोबर २०२२ च्या आदेशानुसार, अनधिकृत बांधकाम नियंत्रण कक्षाची स्थापना केली होती. या विभागाची प्रमुख जबाबदारी अजित मुठे यांच्यावर सोपवण्यात आली होती. अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण मिळवण्यासोबतच ही बांधकामे पुन्हा उभी राहू नयेत म्हणून कायदेशीर न्यायालयीन प्रक्रिया पार पाडण्याची जबाबदारी उपायुक्त अजित मुठे, नऊही प्रभागांचे सहायक आयुक्त आणि त्या त्या विभागाच्या कनिष्ठ अभियंत्यांवर होती.

### कारवाई न केल्यामुळेच बांधकामे फोफावली

एच व जी प्रभाग समिती वगळता उपायुक्त अजित मुठे यांची अनधिकृत बांधकामविरोधी कारवाई दिसली नाही. त्यांनी जाणीवपूर्वक अनेक अतिक्रमणधारकांना वगळले होते. याचे परिणाम म्हणून अनेक ठिकाणी अनधिकृत बांधकामे सुरूच राहिली. पालिका आयुक्त व राज्य सरकारकडे उपायुक्त अजित मुठे आणि टीमविरोधातील या वाढत्या तक्रारींमुळेच त्यांची बदली करण्यात आली आहे. विशेष म्हणजे त्यात आता प्रभाग समिती 'ई'मधील १८ इमारतींवर कारवाई न केल्याने उपायुक्त अजित मुठे, सहायक आयुक्त नीता कोरे व अभियंता कृतार्थ धानवे यांच्या चौकशीचे निर्देश महाराष्ट्र सरकारच्या अवर सचिव निकिता पांडे यांनी दिले आहेत.

---

सकाळ पा.नं. १

# जयंत पाटील यांना 'ईडी'चे पुन्हा समन्स

मुंबई, ता. १५ : राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांना सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) चौकशीसाठी दुसरे समन्स पाठवले आहे. त्यात पाटील यांना २२ मे रोजी 'ईडी'च्या कार्यालयात चौकशीसाठी हजर राहण्यास सांगितले आहे.

आयएल अँड एफएसने दिलेल्या संशयास्पद कर्जप्रकरणी पाटील यांची चौकशी होणार आहे. पाटील यांनी 'ईडी'कडे वेळ मागून घेतली होती.

---

सकाळ पा.नं. १०

# केरळ स्टोरीवरून जम्मूत दोन गटांत वाद

जम्मू, ता. १५ : येथील सरकारी वैद्यकीय महाविद्यालयाच्या वसतिगृहामध्ये केरळ स्टोरी चित्रपटावरून रविवारी रात्री दोन गटांमध्ये हाणामारी झाल्याची माहिती सोमवारी पोलिसांनी दिली. यात पाच विद्यार्थी जखमी झाल्याचे प्राचार्यांनी सांगितले. विद्यालयातील प्रथमवर्षाच्या एका विद्यार्थ्याने महाविद्यालयाच्या अधिकृत व्हॉट्सअप ग्रुपवर चित्रपटाची लिंक शेअर केल्याने त्याच्या वर्गातील अन्य एका विद्यार्थ्याने आक्षेप नोंदवला त्यावरून दोन गटांत हाणामारी झाली.

---

सामना पा.नं. ६

# वृद्धेची आत्महत्या

विरार : आजारपणाला कंटाळून ७० वर्षीय वृद्ध महिलेने आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. गौरी पुरंदरे असे मृत महिलेचे नाव आहे. विराटनगर येथील चाणक्य चौक येथे राहणाऱ्या गौरी पुरंदरे या महिलेला डोळे दुखणे, शारीरिक दुखणे, निद्रानाश असा त्रास होता. कोणत्याही औषधाने प्रकृतीला आराम वाटत नसल्यामुळे रविवारी सकाळी त्यांनी आत्महत्या केली.

---

सामना पा.नं. ६

# मोबाईल लंपास

वसई : दुचाकीवरून आलेल्या चोरट्यांनी धूम स्टाईलने मोबाईल चोरल्याची घटना उघडकीस आली आहे. याबाबत वालीव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नायगाव येथील सनटेक इमारतीत राहणारे रुद्र गौतम हे सातीवली ओव्हर ब्रीजखालून जात असताना पाठीमागून आलेल्या दोन चोरट्यांनी त्यांच्या हातातील मोबाईल खेचून पळ काढला.

---

सामना पा.नं. ६

# घरफोडी

नालासोपारा : सनशाईन पार्कमध्ये राहणारे अस्लम खान यांचे घर चोरट्यांनी फोडल्याची घटना घडली. चोरट्यांनी घराचा दरवाजा तोडून आत प्रवेश केला. कपाटातील सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम असा एकूण १ लाख ६५ हजारांचा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी आचोळे पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

CS CamScanner

म. टा. पु. पा. नं. १

# घरफोडी करणारा सहा तासांत अटकेत

**म. टा. वृत्तसेवा**, मिरा-भाईंदर

भाईंदर पूर्व परिसरातील इमारतीत वास्तव्यास असलेले एक कुटुंब लग्नसोहळ्यासाठी बाहेर गेले असता, अज्ञात व्यक्तीने घरफोडी करून लाखो रुपयांची रोकड लंपास केल्याची घटना नुकतीच घडली होती. या प्रकरणी तपास करत नवघर पोलिसांनी अवघ्या सहा तासांत एका आरोपीला ठाणे परिसरातून अटक केली आहे.

भाईंदरच्या आरएनपी पार्क परिसरातील साई सरोज इमारती राहणारे धीरज परमार यांचे संपूर्ण कुटुंब ८ मे रोजी लग्नसोहळ्यासाठी घराबाहेर गेले होते. दुसऱ्या दिवशी त्यांच्या घरात घरकाम करण्यासाठी मदतनीस महिला आली असता, तिला कपाटातील साहित्य अस्ताव्यस्त पडलेले दिसले. यासंबंधीची माहिती तिने परमार यांना दिल्यानंतर, अज्ञात व्यक्तीने घरफोडी करून सुमारे अडीच लाख रुपयांची रोकड लंपास केल्याचे त्यांना आढळले होते. या प्रकरणाची तक्रार परमार यांनी नवघर पोलिस ठाण्यात केल्यानंतर, अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

त्यानंतर पोलिसांनी तात्काळ तपास सुरू केला असता, सीसीटीव्हीआधारे एक अज्ञात व्यक्ती पोलिसांना दिसून आली. त्याची अधिक माहिती घेतली असता, त्याचे नाव चेतन मोकाशी असल्याचे समोर आले होते. तांत्रिक माहितीआधारे त्याला ठाण्यातून अटक करण्यात आली आहे. त्याच्याकडून चोरीस केलेली अडीच लाख रुपयांची रोकड व घरफोडीसाठी वापरलेले साहित्य पोलिसांनी जप्त केले आहे.

म. टा. पु. पा. नं. १

# अनधिकृत बांधकामांबाबत हलगर्जी?

**म. टा. वृत्तसेवा**, वसई

वसई-विरार महापालिका हद्दीत प्रभाग समिती 'ई'मध्ये १८ अनधिकृत इमारती आहेत. या इमारतींवर पालिकेतर्फे कारवाई होत नसल्याच्या सामाजिक कार्यकर्ते तसेच नागरिकांच्या तक्रारी आहेत. या तक्रारींची दखल घेत या प्रकरणाची योग्य चौकशी करण्याचे निर्देश राज्य सरकारच्या अवर सचिव निकिता पांडे यांनी नुकतेच वसई-विरारचे आयुक्त अनिलकुमार पवार यांना दिले आहेत.

## उपायुक्त, साहाय्यक आयुक्तांवर कारवाईचे पत्र



महापालिकेच्या विकास आराखड्यातील आरक्षित जागांवर आणि शहरात होणाऱ्या अतिक्रमणांविरोधात कारवाईसाठी २९ ऑक्टोबर २०२२च्या आदेशानुसार, आयुक्तांनी 'अनधिकृत बांधकाम नियंत्रण कक्षा'ची स्थापना केली होती. शहरात मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे झालेली आहेत. त्यामुळे पालिकेतर्फे या अतिक्रमणांवर जोरदार करावी सुरू होती. प्रभाग समिती 'ई'मधील १८ अनधिकृत इमारतींवर कारवाई होत नसल्याने पालिकेच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उभे राहत होते. अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण मिळवण्यासोबतच बांधकामे उभी राहू नयेत म्हणून कायदेशीर न्यायालयीन प्रक्रिया पार पाडण्याची जबाबदारी उपायुक्त, तसेच नऊही प्रभागांचे सहायक आयुक्त आणि त्या त्या विभागाच्या कनिष्ठ अभियंत्यांवर होती.

मात्र या १८ इमारतींवर कारवाई होत नसल्याबाबतची तक्रार सरकारच्या नगर विकास विभागाकडे आली होती. या तक्रारींमध्ये उपायुक्त, प्रभारी सहायक आयुक्त व अभियंता यांची नावे नमूद केली असून कामात हलगर्जीचे आरोप लावत गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात आली होती. या तक्रारींची दखल घेत राज्य सरकारच्या नगरविकास विभागातर्फे पालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांना या प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही कारवाई असे निर्देश देण्यात आले आहेत.

CS CamScanner

दि. १६/०५/२०२३

लोकसत्ता पा. न. १

### पेच कायम : सिद्धरामय्या की शिवकुमार?

# कर्नाटक मुख्यमंत्रीपदाचा निर्णय आज

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नवी दिल्ली :** काँग्रेसनेते सिद्धरामय्या आणि प्रदेशाध्यक्ष डी. के. शिवकुमार हे दोघेही कर्नाटकच्या मुख्यमंत्रीपदाचे दावेदार असल्याने त्यांना काँग्रेस नेतृत्वाने चर्चेसाठी दिल्लीत बोलावले होते, मात्र शिवकुमार यांनी प्रकृतीचे कारण पुढे करीत दिल्ली भेट टाळली. त्यामुळे मुख्यमंत्रीपदाचा पेच कायम असल्याचे सोमवारी स्पष्ट झाले. मात्र आज, मंगळवारी संध्याकाळपर्यंत काँग्रेस अध्यक्ष निर्णय जाहीर करतील, असे पक्षातर्फे रात्री उशिरा सांगण्यात आले.

काँग्रेसच्या निरीक्षकांनी नवनियुक्त आमदारांचे मत जाणून घेतल्यानंतर आपला अहवाल पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्याकडे सोपवला आहे. त्यावर खरगेंच्या घरी रात्री उशिरापर्यंत काथ्याकूट झाला. त्यानंतर कर्नाटकचे प्रभारी रणदीप सूरजेवाला यांनी, पक्ष आपला निर्णय मंगळवार संध्याकाळपर्यंत जाहीर करील, अशी माहिती पत्रकारांना दिली. ''निरीक्षकांनी काँग्रेस अध्यक्षांना अहवाल सादर केला आहे. आम्ही सिद्धरामय्या आणि शिवकुमार यांच्यासह राज्यातील सर्व वरिष्ठ नेत्यांशी सल्लामसलत करू आणि त्यानंतर काँग्रेस अध्यक्ष (पान ४ वर)



“ शिवकुमार यांच्याकडे मुख्यमंत्रीपदासाठी अद्याप वय हा घटक आहे; परंतु माझ्या बाबतीत तसे नसल्याने पहिले ३० महिने मला मुख्यमंत्रीपद दिले जावे. - **सिद्धरामय्या,**

माजी मुख्यमंत्री, कर्नाटक



“ माझ्या कारकीर्दीत काँग्रेसने १३५ जागा जिंकल्या आहेत. मी एकटा लढलो आणि एकटी व्यक्ती बहुमत मिळवू शकते, हे सिद्ध केले आहे. - **डी. के. शिवकुमार,**

कर्नाटक प्रदेशाध्यक्ष, काँग्रेस

## सोनियांची मध्यस्थी?

मुख्यमंत्रीपदाचा निर्णय खरगेंना घ्यावा लागणार आहे; परंतु सिद्धरामय्या यांना मुख्यमंत्रीपद द्यायचे असेल तर सोनिया गांधी शिवकुमार यांची समजूत काढण्याची शक्यता आहे. मी तुरुंगात असताना सोनिया गांधी भेटायला आल्या होत्या, असे शिवकुमार म्हणाले होते. शिवकुमार हे सोनिया आणि राहुल गांधी यांच्या जवळचे मानले जातात. परंतु शिवकुमार किंवा सिद्धरामय्या यांनी निकालानंतर त्यांची भेट घेतलेली नाही. दिल्लीत सोनियांच्या भेटीनंतर मुख्यमंत्रीपदाच्या नावावर शिक्कामोर्तब केले जाण्याची शक्यता आहे.

लोकसत्ता पु. पा. न. १

# इंग्रजी स्पेलिंग येत नसल्याने शिक्षिकेची सहा वर्षांच्या मुलाला मारहाण

### भाईंदरमधील घटना, शिक्षिकेविरोधात गुन्हा

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** इंग्रजी स्पेलिंग येत नसल्याने एका खासगी शिकवणी घेणाऱ्या शिक्षिकेने सहा वर्षांच्या मुलाला बेदम मारहाण केल्याची घटना उघड झाली आहे. या मारहाणीत जखमी झालेल्या मुलावर शासकीय रुग्णालयात उपचार करण्यात आले. भाईंदर पोलिसांनी या शिक्षिकेविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

सहा वर्षांचा मुलगा भाईंदरच्या देवल नगर परिसरात राहतो. त्याचे इंग्रजी कच्चे असल्याने (पान ३ वर)

### मारहाणीच्या घटना

**७ मार्च २०२३**
भिवंडी येथे दीपा अग्रवाल या खासगी शिकवणी घेणाऱ्या शिक्षिकेकडून दोन मुलांना मारहाण. विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देता आली नाहीत, म्हणून शिक्षिकेने मारहाण केल्याचा आरोप. निजामपूर पोलीस अल्पवयीन मुलांचे संरक्षण कायद्यान्वये शिक्षिका दीपा अग्रवाल हिच्याविरोधात गुन्हा दाखल.

**७ एप्रिल २०२३**
भाईंदर येथे खासगी शिकवणी शिक्षकाकडून १२ वर्षीय मुलाला मारहाण. मुलाच्या कानाला दुखापत. भाईंदर पोलीस ठाण्यात शिक्षकाविरोधात गुन्हा दाखल.

**२७ एप्रिल २०२३**
कांदिवलीत खासगी शिशुवर्गातील दोन शिक्षिकांकडून चिमुकल्या मुलांना अमानुष मारहाण. याप्रकरणी झीनल छेडा आणि भक्ती शाह या दोघींना अटक.

**१७ मार्च २०२३**
ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यात वाशिंद येथे शिक्षकाकडून ८ वीमधील विद्यार्थ्याला माराहाण. मुलाच्या कानाला इजा. वाशिंद पोलीस ठाण्यात गुन्हा.

**३१ जानेवारी २०२३**
कल्याण येथे शिक्षकाकडून ५ वर्षीय मुलाला मारहाण. गुन्हा दाखल.

लोकसत्ता पु. पा. न. १

# कामण येथे चित्रीकरणाच्या स्टुडिओला भीषण आग

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई :** वसई पूर्वेच्या कामण येथील भजनलाल इंडस्ट्रीजमधील चित्रीकरणाच्या स्टुडिओला भीषण आग लागल्याची घटना शुक्रवारी रात्री बाराच्या सुमारास घडली. यात स्टुडिओतील सामान जळून खाक झाले आहे. मागील वर्षी डिसेंबर महिन्यात अभिनेत्री तुनिषा शर्मा हिने याच स्टुडियोमध्ये गळफास घेऊन आत्महत्या केली होती.

वसई पूर्वेच्या कामण भागात विविध मालिकांचे चित्रीकरण करण्यासाठी स्टुडिओ उभारण्यात आले आहेत. भजनलाल इंडस्ट्रीजमध्ये असलेल्या स्टुडिओ सेटला शुक्रवारी रात्री अचानकपणे आग लागली होती. सेटवर असलेले लाकडी व फायबर साहित्य यामुळे आगीची तीव्रता वाढली होती. अवघ्या एक ते दीड तासाच्या अथक प्रयत्नांनंतर अग्निशमन दलाने आग नियंत्रणात आणली. या लागलेल्या आगीत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र येथील सामान जळून खाक झाले आहे. नेमकी आग कोणत्या कारणामुळे लागली याचे कारण समजू शकले नाही, अशी माहिती पालिकेच्या अग्निशमन दलाच्या जवानांनी दिली आहे.

CamScanner

दि. १६/०५/२०२३

लोकसत्ता पु. पा. न. ४

# घरफोडी, वाहन चोरीप्रकरणी तीन सराईत आरोपी अटकेत

## १२ गुन्हे उघडकीस

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई :** घरफोडी आणि वाहन चोरी करणाऱ्या सराईत तीन आरोपींना विरार गुन्हे कक्ष ३ ने अटक केली आहे. त्यांच्याकडून विविध पोलीस ठाण्यात दाखल असलेले १२ गुन्हे उघडकीस आणले आहेत.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात मागील काही महिन्यांपासून घरफोडी आणि चारचाकी वाहनांच्या चोरीच्या घटना वाढल्या आहेत. नालासोपारा येथील कावेरी ज्वेलर्स फोडून चोरी केल्याची घटना नुकताच घडली होती. याप्रकरणी नालासोपारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.



विरार गुन्हे शाखा ३ च्या पथकाने या गुन्ह्याचा तपास सुरू केला होता. मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपीला पोलिसांनी भिवंडीतून अटक केली आहे. दीपकसिंग उर्फ भुशीसिंग राजूसिंग टाक (३९) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याने चोरलेल्या १० लाखांच्या तीन मोटारी हस्तगत केल्या असून, घरफोडी चोरी व चारचाकी वाहन चोरीचे १० गुन्हे उघडकीस आले आहेत.

दुसरीकडे पेल्हार पोलीस ठाण्याच्या हद्दीत ट्रक चोरीप्रकरणी गुन्हा दाखल झाला होता. यातील दोन आरोपींना भिवंडी येथून अटक केली. फहीम अब्बास भुरे आणि दिनेश भोईर, अशी आरोपींची नावे असून त्यांनी चोरलेला ट्रक व अन्य वाहन, असा पाच लाख ५० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करून दोन गुन्हे उघडकीस आणले आहेत. ही कारवाई विरार गुन्हे कक्ष ३ चे पोलीस निरीक्षक प्रमोद बडाख, पोलीस उपनिरीक्षक शिवाजी खाडे, उमेश भागवत व त्यांच्या पथकाने केली आहे.

लोकसत्ता पु. पा. न. ४

# विरारला हल्ल्यात एकाचा मृत्यू

**वसई :** विरारमध्ये राहणाऱ्या दोन भावंडांवर शस्त्राने वार करून हल्ला करण्यात आला आहे. या हल्ल्यात एकाचा मृत्यू झाला असून, दुसरा जखमी झाला आहे. पोलिसांनी याप्रकरणी तिघांना अटक केली आहे. प्रेमप्रकरणातून हा हल्ला झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

दत्तात्रय शिंदे हे विरार पूर्वेतील जानुवाडी येथील वज्रेश्वरी अपार्टमेंटमध्ये राहतात. रविवारी रात्री त्यांची पत्नी याच परिसरात राहणाऱ्या राहुल शिंदे याच्याशी फोनवर बोलत होती. त्यामुळे संतापलेले दत्तात्रय शिंदे हे भाऊ सचिन यांच्यासह राहुल शिंदे याला जाब विचारण्यासाठी गेले. मात्र, या भावंडांना राहुल शिंदे आणि त्याच्या दोन साथीदारांनी मारहाण केली. यावेळी त्यांच्यावर चाकूने हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात सचिन शिंदे यांचा मृत्यू झाला. तर जखमी दत्तात्रय शिंदे यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहे. पत्नीशी फोनवर बोलण्याचा राग आल्याने दोन्ही भाऊ जाब विचारण्यासाठी गेले असता त्यांच्यावर हा हल्ला करण्यात आला, अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कांबळे यांनी दिली.

CamScanner

DIGITAL
मुंबई, मंगलवार, 16 मई 2023
प्रवासी संदेश
PRAVASI SANDESH
www.pravasisandesh.news
9004746488 pravasisandesh1@gmail.com www.facebook/ pravasisandesh1/

# क्राइम ब्रांच यूनिट 3 ने ज्वेलर्स की दुकान में चोरी करने वाले आरोपियों को किया गिरफ्तार

## लाखों का माल जब्त, अन्य 12 अपराधों की सुलझी गुत्थी, कार-ट्रक भी बरामद

प्रवासी संदेश टीम।

**वसई।** ज्वेलर्स की दुकान के शटर तोड़कर चोरी व कार-ट्रक चुराने वाले आरोपी को गिरफ्तार एमबीवीवी की क्राइम ब्रांच यूनिट 3 ने गिरफ्तार करने में सफलता पाई है। इस कार्रवाई में आरोपी के पास वाहन समेत कुलमिलाकर 15,50,000 रुपये का माल जब्त करने के साथ 12 अपराधों की गुत्थी सुलझाई गयी है। यह कार्रवाई मीरा-भाईंदर पुलिस आयुक्तालय क्राइम डीसीपी अविनाश अंबुरे व एसीपी अमोल मांडवे के मार्गदर्शन में क्राइम ब्रांच 3 विरार युनिट के पीआई प्रमोद बड़ाख, पीएसआई शिवाजी खाड़े व उमेश भागवत की टीम ने की है। यह जानकारी पुलिस अधिकारी ने रविवार को दी है।

### मामला हुआ दर्ज

पुलिस अधिकारी ने बताया कि 11 सितंबर 2022 रात्रि 9:30 से 12 सितंबर 2022 रात्रि 2:35 के दरम्यान कावेरी ज्वेलर्स, शॉप क्र.13, पॅराडाईज सोसायटी, नालासोपारा पश्चिम स्थित बंद पड़ा ज्वैलर्स की दुकान पर लोहे की ग्रिल का ताला व लोहे के बंद शटर के ताले को किसी चीज से तोड़कर सेंटर का ताला तोड़ने का प्रयास करने पर भी सेंटर का ताला नहीं टूटा, ज्वैलर्स की दुकान के बाहर सी.सी.




टी.वी कैमरा चोरी करके, ज्वैलर्स की दुकान में चोरी का प्रयास किया गया। शिकायतकर्ता गोविंदसिंह कैलासिंह पुरोहित की शिकायत पर नालासोपारा पश्चिम थाने ने उपरोक्त मामले में आरोपी पर कलम 457, 380, 379, 427, 511 के तहत केस दर्ज किया गया था।

### लिया हिरासत में, पूछताछ

पुलिस अधिकारी ने बताया कि मीरा-भाईंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय क्षेत्र में घरों में चोरी और चौपहिया वाहनों की चोरी में वृद्धि के कारण, वरिष्ठ अधिकारियों ने उक्त घटनाओं का गंभीरता से संज्ञान लिया है और आरोपियों का पता लगाने और अपराधों को रोकने के निर्देश दिए हैं। उक्त घटना के अनुरूप वरिष्ठों द्वारा दिये गये निर्देश एवं आदेश के अनुसार उक्त अपराध की जांच क्राइम ब्रांच -3 को सौंपी गई। जिसके बाद क्राइम ब्रांच 3 के अधिकारियों एवं कर्मचारियों द्वारा प्राप्त सूचनाओं के आधार पर गुप्त मुखबिरों एवं तकनीकी विश्लेषण के माध्यम से आरोपी दिपकसिंह उर्फ भुशीसिंह राजुसिंह टाक (39) को हिरासत में लिया। हिरासत में लेकर जांच करने पर पता चला कि उक्त आरोपी ने उपरोक्त अपराध किया है और उसे 8 मई को गिरफ्तार किया गया।

### कार-ट्रक चुराने वाले गिरफ्तार

गिरफ्तार आरोपी की आगे की जांच करने पर 10,00,000 रुपये मूल्य की 2 इको कार और 1 शेवरलेट एन्जॉय कार जब्त की गई। पुलिस ने बताया कि साथ ही चोरी व चौपहिया वाहन चोरी के 10 अपराधों का खुलासा हुआ है। पुलिस ने बताया कि पकड़ा गया आरोपी शातिर अपराधी है व उसके खिलाफ मकोका, हत्या, डकैती, सेंधमारी, खासकर ज्वेलर्स की दुकान में चोरी, चौपहिया मोटर वाहन की चोरी जैसे 10 से अधिक अपराध गुजरात, नवी मुंबई, ठाणे शहर, मीरा भायंदर वसई विरार पुलिस कमिश्नरेट के तहत विभिन्न पुलिस थानों में दर्ज हैं। इसी तरह से 8 मई को शिकायतकर्ता लक्ष्मण चौहान की एमएच 48/ जे 2281 गुडस कॅरीयर टाटा मोटर्स कंपनी की 5,00,000 रुपये की कीमत ट्रक चोरी में आरोपी फहीम अब्बास भुरे और दिनेश अनांता भोईर को गिरफ्तार कर लिया गया है। ट्रक और अपराध में प्रयुक्त बाइक के साथ जब्त किया गया तथा 2 अपराधों का खुलासा हुआ है।

CamScanner

लोकमत



# तंबाखूजन्य पदार्थ जप्त

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : नायगाव येथे किराणा दुकानदाराकडे तंबाखूजन्य पदार्थाचा साठा विक्रीसाठी ठेवला असताना पोलिसांनी जप्त केला आहे. जुचंद्र गावाच्या हद्दीतील मंगलमूर्ती किराणा दुकानांमध्ये आरोपी फहीम हासीउद्दीन अहमद (३१) यांनी शनिवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास ४३६२ रुपये किमतीचा महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला सुगंधित पान मसाला असा तंबाखूजन्य पदार्थ गुटखा विक्री करता ठेवला असताना सापडला होता. रविवारी नायगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

Mumbai Main
Page No. 4 May 16, 2023
Powered by: erelego.com

CamScanner

दैनिक
आमची मुंबई
ठाणे/पालघर येथून एकाचवेळी प्रकाशित.
वर्ष : १२ | अंक : ०५६ | बुधवार १७ मे २०२३ | Post-Reg-No. PLG/158/2022-2024 | रु. २ | पाने ०८

# १५० हून अधिक सीसीटीव्ही फुटेजने गुन्हे शाखा २ ने आरोपींना पकडले, तक्रारदार महिला चोर असल्याचे निष्पन्न झाले

**वसई.** MBVV पोलीस आयुक्तालयांतर्गत गुन्हे शाखा २ वसई युनिटच्या पथकाने असाच एक गूढ उकलला आहे. वाचून तुमचाही भडका



उडेल. प्रत्यक्षात गुन्हा घडल्यानंतर अवघ्या ३ दिवसांत या गुन्ह्यातील अज्ञात आरोपींची नावे शोधून, त्यांना ताब्यात घेऊन कटाची उकल करण्यात गुन्हे शाखा २ च्या पथकाला यश आले आहे. वरील गूढ उकलण्यासाठी टीमने १५० हून अधिक सीसीटीव्ही फुटेज स्कॅन केले होते. डीसीपी (गुन्हे) अविनाश अंबुरे, एसीपी अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा २ युनिटचे पीआय शाहूराज रणवरे, सपोनिरी सुहास कांबळे, सपोनिरी सागर शिंदे यांच्या पथकाने ही कारवाई केली. ही माहिती पोलीस अधिकाऱ्याने मंगळवारी दिली.पोलिसांनी सांगितले की, ९ मे २०२३ रोजी सायंकाळी ५:३० ते १० मे २०२३ रोजी सकाळी १०:२५ वाजेदरम्यान फिर्यादी निखत असगर खान (३८, रा. बी/२१०, सांजेरी) अपार्टमेंट, विशालनगर वसई पश्चिम येथील अज्ञात व्यक्तीच्या घरात चोरट्याने कुलूप तोडून प्रवेश केला. बेडरूममधील कपाटाच्या तिजोरीचे कुलूप तोडून १०,३०,००० रुपये किमतीचे



दागिने व रोख रक्कम चोरून पळ काढला. याप्रकरणी फिर्यादीवरून माणिकपूर फिर्यादी निखत यांच्या फिर्यादीवरून पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.पोलीस अधिकाऱ्याने सांगितले की, सदर गुन्ह्याची नोंद झाल्याची माहिती मिळताच वरिष्ठांच्या आदेशानुसार सदर गुन्हा घटनास्थळाला भेट देऊन सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या माध्यमातून पाहणी केली.फुटेज तपासले असता गुन्ह्यात आरोपी आढळून आला. घटनास्थळावरून मिळालेल्या फुटेजवरून व तांत्रिक तपासातून आरोपीचे नाव पडताळून वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली वेगवेगळी पथके तयार करण्यात आली. त्याला अटक करून आरोपीचा शोध सुरू करण्यात आला.या गुन्ह्यातील आरोपी मोहम्मद कमर रऊफ खान (२८) याला गोवंडी,मुंबई येथून ताब्यात घेण्यात आले.या आरोपीच्या चौकशीत सदर गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले. त्याचा सहकारी मित्र नसीम मोईन खान (४०, रा. वसई पश्चिम) या आरोपी नसीम मोईन खान याच्या मोबाईल फोनच्या तांत्रिक विश्लेषणानुसार, आरोपीला फाउंटन हॉटेल, घोडबंदर रोड, काशिमीरा येथून ताब्यात घेण्यात आले. असगर खान वय ३८ वर्षे, रा. वसई पश्चिम, ती तिच्या पतीने वेळोवेळी परदेशातून पाठवलेले पैसे खर्च करायची, परतीच्या मुक्कामानंतर खर्च झालेल्या रकमेबद्दल पतीला काय सांगायचे या संभ्रमात असतानाच त्यांची ओळख नसीम याच्याशी भेट झाली. त्यांच्या इमारतीत राहणारा मोईन खान याने त्याच्याशी संगनमत करून घरफोडी व चोरीचा बहाणा करून सदर सोन्याचे दागिने तक्रारदाराने त्याच्या भावाच्या संकेश्वर नगर नालासोपारा पूर्व येथील घरी १०,३०,००० असे एकूण १०,३०,००० नेले. या गुन्ह्यातील सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम तपासानंतर जप्त करण्यात आली.

# र स्पोर्ट्स नेटवर्क वादात; रॅपर
# ा कारण, नेमकं प्रकरण काय?

भाष्य केल्याचा आणि धार्मिक भावना दुखावल्याचा आरोप असलेल्या फारुकीला जानेवारी २०२१ मध्ये अटक करण्यात आली आणि त्यानंतर त्याची रवानगी मध्य प्रदेशातील इंदूर येथील तुरुंगात करण्यात आली होती. एफआयआरनुसार, १ जानेवारी २०२१ रोजी इंदूरच्या ५६ दुकान परिसरातील एका कॅफेमध्ये हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. आता या प्रकाराचा तपास सुरू आहे. या प्रकरणी भाजप आमदार मालिनी लक्ष्मण सिंह गौड यांचा मुलगा एकलव्य सिंह गौड याने फारुकी आणि इतरांविरोधात तक्रार दाखल केली होती. 'मी आणि माझे काही सहकारी एक कार्यक्रम पाहण्यासाठी गेलो होते. या कार्यक्रमात हिंदू देव-देवतांबाबत विनोद केले गेले. त्यानंतर आम्ही हा कार्यक्रम थांबवण्यास आयोजकांना भाग पाडले'. असं यांनी त्यांच्या तक्रारीत म्हटलं आहे. त्यानंतर फारुकी आणि अन्य काही जणांना भारतीय दंड संहितेच्या विविध कलमांखाली शिक्षेस पात्र असलेल्या कथित गुन्ह्यांसाठी अटक करण्यात आली होती. ज्यात कलम २९५-A समाविष्ट आहे. हा कलम कोणत्याही वर्गाच्या धार्मिक भावनांचा उद्रेक करण्याच्या हेतूने जाणीवपूर्वक आणि द्वेषकारक कृत्यांशी संबंधित आहे. कोविड -१९ महामारी दरम्यान परवानगीशिवाय शो आयोजित केल्याचा आरोप त्याच्यावर ठेवण्यात आला होता. तसेच त्याच्या आयपीसीच्या इतर संबंधित तरतुदींनुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. सद्भावना वाढवणे हे घटनात्मक कर्तव्यांपैकी एक आहे. असं मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने नमूद करत फारुकीला जामीन नाकारला होता. पण सर्वोच्च न्यायालयाने ५ फेब्रुवारी २०२१ रोजी उच्च न्यायालयाच्या आदेशाला स्थगिती देत फारुकीची अंतरिम जामिनावर सुटका केली होती. यावेळी सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की त्यांनी रद्द करण्याच्या याचिकेच्या गुणवत्तेवर भाष्य केलेले नाही आणि जर कोणतीही याचिका दाखल केली गेली तर ती कायद्यानुसार तिच्या गुणवत्तेच्या आधारे विचारात घेतली जाईल.

CamScanner

# वसई-विरारमध्ये ९० दिवसांत ५१ अपघात, ३९ जणांचा मृत्यू

## रस्ते झाले चांगले पण वाहनांचा वेग वाढला : नियमांकडे दुर्लक्ष

**रिॲलिटी चेक**

**मंगेश कराळे**
लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** मीरा भाईंदर वसई विरार पोलिस आयुक्तालयांतर्गत बहुतांश रस्ते चांगले झाले आहेत. त्यामुळे वाहनांचा वेगही वाढला आहे. मात्र, वाहनधारक वाहतूक नियमांकडे दुर्लक्ष करीत असल्याने अपघाताचे प्रमाण वाढले आहे. गेल्या तीन महिन्यांत पोलिस आयुक्तालयांतर्गत ५१ अपघात झाले आहेत. त्यात ३९ जणांचा मृत्यू झाला, तर अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत.

मुंबई - अहमदाबाद महामार्ग असो की शहरातील मार्ग असो, सर्वच रस्ते चांगले आहेत. त्यामुळे वाहने वेगाने ये-जा करीत आहेत. परिणामी, अपघाताचे प्रमाण वाढले आहेत. झालेल्या अपघातांमध्ये दुचाकीचालकांनी हेल्मेट न घातल्यामुळे त्यांचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. त्यामुळे हेल्मेट घालूनच दुचाकी चालवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.




### सर्वाधिक अपघात कोठे?

काशीमीरा, वालीव, पेल्हार आणि मांडवी या चार पोलिस ठाण्यांच्या हद्दीतून मुंबई- अहमदाबाद महामार्ग जात असून ३२ अपघात झाले असून २३ जणांचा मृत्यू झाला आहे.

### ...तर अपघातांना प्रतिबंध

वाहतूक नियम हे केवळ दंड वसुलीसाठी नसून ते पाळावेत यासाठी आहेत. वाहतूक नियम पाळले गेले तर अनेक अपघातांना प्रतिबंध होईल. सर्वांनी वाहतूक नियमांचे तंतोतंत पालन करावे जेणेकरून रस्ते अपघात प्रतिबंध होतील.

- पोलिस प्रशासन

### १७ पोलिस ठाण्यांच्या हद्दीत अपघात

पोलिस आयुक्तालयांतर्गत १७ पोलिस ठाण्याच्या हद्दीत १ जानेवारी ते ३१ मार्च या ९० दिवसांच्या कालावधीत ५१ अपघात झालेत.

### महामार्गावर १२ ब्लॅक स्पॉट

साधना हॉटेल, चिंचोटी ब्रिज, वाफाणे फाटा, दुर्गा माता मंदिर, गोल्डन ट्युलिप हॉटेल, बर्मा सेल, सायली पेट्रोल पंप, वगणपाडा, वासमारे ब्रिज, एच पी पेट्रोल पंप, रॉयल गार्डन हॉटेल, किनारा हॉटेल या १२ ब्लॅक स्पॉटवर अपघात जास्त होतात.

### अति वेग हेच कारण

१ **अपघात होण्यास अति वेग हेच कारण आहे. काही वेळा चालकांची निष्काळजी, ओव्हरटेक करणे, चुकीच्या दिशेने वाहन चालविणे, ही मुख्य कारणे आहेत.**

२ विना हेल्मेट, सीटबेल्ट, अतिवेगाने वाहने चालवणे, विना परवाना वाहन चालवणे, प्रदूषणकारी वाहने. अशा आदी गैरप्रकारामुळेही महामार्गावर अपघाताचे प्रमाण वाढले आहे.

### कोणत्या पोलिस ठाण्यांतर्गत किती अपघात ?

| पोलिस ठाणे | अपघात |
|---|---|
| मीरा रोड | ० |
| काशीमीरा | ६ |
| भाईंदर | २ |
| उत्तन | ० |
| नवघर | १ |
| नयानगर | ० |
| वसई | १ |
| माणिकपूर | २ |
| नायगाव | १ |
| तुळिंज | ३ |
| वालीव | १३ |
| आचोळे | ३ |
| विरार | ४ |
| पेल्हार | ६ |
| मांडवी | ७ |
| नालासोपारा | १ |
| अर्नाळा | १ |



CS CamScanner